■ RNI NO. MAHMAR/2020/79996 नवे विचार...नवी सुरुवात ■ Postal Reg. No. SGL/135/2025-2027

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ५७ ■ शनिवार, ३१ मे २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# महाविकास आघाडीत 'महागोंधळ'?

## आघाडी की 'स्वबळ' : निर्णयच नाही; जिल्ह्यात 'गुडघ्यास बाशिंग बांधलेले' मात्र पडले संभ्रमात!




**सांगली : हॅलो प्रभात**

**महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या निवडणुकांची रणधुमाळी सध्या सुरू झाली असली तरी महाविकास आघाडीत मात्र 'महागोंधळ' सुरूच आहे. निवडणुका स्वबळावर लढवायच्या की, महाविकास आघाडीतून लढवायच्या यासंदर्भात कोणताच निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतला नसल्यामुळे 'गुडघ्यास बाशिंग बांधून बसलेले' इच्छूक मात्र संभ्रमात पडले आहेत.**

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची नवीन कार्यकारिणी पुढील जून महिन्यात अस्तित्वात येईल, त्यानंतरच पुढील निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस घेणार आहे, तर सुरूवातीला स्वबळाची भाषा करणारी काँग्रेस आता मात्र 'महायुती' संघटितरित्या मैदानात उतरणार असताना तळ्यात-मळ्यातची भूमिका घेत आहे. त्यातच जिल्हा काँग्रेसमध्ये काही ठिकाणी करण्यात आलेल्या बदलांमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे दिर्घकाळ निवडणुकीची प्रतिक्षा करणार्या काँग्रेस कार्यकर्त्य गोंधळात पडले आहेत.

अजितदादा-शरद पवार यांच्या मनोमिलनाची चर्चा मध्यंतरी खूप झाली, पण मनोमिलनाचं नंतर बघु, कामाला लागा असा आदेश अजितदादा पवार यांनी देऊन मनोमिलनाचं 'भूत' कार्यकर्त्यांच्या डोक्यावरून उतरविलं. उध्दवसेना आणि राजसेनेचा सांगली जिल्ह्यात फारसा राजकीय प्रभाव नसला तरी त्यांच्यात सुरू झालेली एकीची चर्चादेखील अद्याप अंतिम निकषावर आलेलीच नाही.

'महायुती' म्हणूनच निवडणूक मैदानात उतरणार असल्याची घोषणा फडणवीसांनी केल्यानंतर सांगली जिल्ह्यात भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना ताकदीने कामाला लागले आहेत, काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार पक्ष) यांच्या गोटात मात्र अद्याप शांतताच आहे. प्रदेश नेतृत्वाने स्वबळावर की आघाडी म्हणून निवडणूक लढवायची याचा निर्णय झाल्याशिवाय निवडणुकीचा 'गाडा' या पक्षांच्या नेत्यांना पुढे नेताच येणार नाही. महाविकास आघाडी म्हणून लढण्याचा निर्णय घेतला तर नंतर जागावाटप आले आणि तिथुनच पुढील दिशा ठरणार आहे, परंतु अद्याप कोणताच निर्णय झाला नसल्याने कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

यांचा निर्णय कधी होतो तेव्हा होऊ द्या नवीन घर बघितलेलं बरं अशी भूमिका आता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील इच्छूक घेतील, असा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे.

## संक्षिप्त...

### कोल्हापुरातील 'आयटी' पार्कसंदर्भात जूनमध्ये बैठक

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



कोल्हापुरात 'आयटी' पार्क उभारण्यासंदर्भात जून महिन्यात या क्षेत्रातील तज्ज्ञांची बैठक घेऊन त्यांना येथील जागा दाखविण्यात येईल. त्यानंतर हा प्रश्न मार्गी लागेल, असे प्रतिपादन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.

डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे आयोजित पश्चिम महाराष्ट्रातील आरोग्यदूत मेळाव्यात ते बोलत होते.

### ३५० वर्षांपूर्वीचा छत्रपती शिवरायांनी बांधलेला पूल अभेद्यच

**सातारा : हॅलो प्रभात**

महाबळेश्वर पावसाचे आगार म्हणून ओळख आहे. दरवर्षीच येथे अतिवृष्टी होते. देशात सर्वाधिक पाऊस असणाऱ्या या ठिकाणी दरवर्षी पावसामुळे रस्ते, पुलांची दुरवस्था होते. मात्र, या तालुक्यातील पार या गावात असा एक पूल आहे, जो छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधला आहे. या पुलाला तब्बल ३५० वर्षे होऊनही हा पूल अजूनही अभेद्य आहे. पाऊस व वादळवाऱ्यातही डौलाने उभा राहिला आहे.




### जिल्हा परिषद शिक्षकांना आता बदल्यांचे वेध

**सोलापूर : हॅलो प्रभात**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत बदलीप्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालयाने अंतिम निकाल दिल्याने जिल्ह्यांतर्गत बदलीचा मार्ग मोकळा झाला आहे. या निकालामुळे बदली इच्छुक शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. ही ऑनलाईन बदली प्रक्रिया केव्हा सुरु होते? आणि या बदल्या कधी होणार? याकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

## 'देणगीतून' समाजासाठी गोशाळा आणि रुग्णालय असणे जरुरीचे : राजेंद्र अर्लेकर

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**



धार्मिक स्थळे मंदिराच्या संरक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे, आपल्या धार्मिक स्थळा मार्फत एखादी गोशाळा दवाखाना शैक्षणिक संस्था असल्या पाहिजेत. यासाठी धार्मिक स्थळ व्यवस्थापनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केरळचे राज्यपाल महामहीम राजेंद्र अर्लेकर यांनी नृसिंहवाडी येथे व्यक्त केले. ते येथे आपल्या नातेवाईकाच्या उपनयन समारंभासाठी आले होते. यावेळी दत्त देव संस्थान कार्यालयात त्यांचा दत्त देव संस्थान मार्फत दत्तप्रतिमा शाल श्रीफळ भेट देऊन सत्कार करण्यात आला यावेळी तें बोलत होते.

ते पुढे म्हणाले शाळा दवाखाने याबाबत आपण नेहमी मिशनरी लोकांच्याकडे बोट दाखवतो तसे न करता धार्मिक स्थळांमध्ये भक्तांच्या सहकार्यातून येणाऱ्या देणगीचा उपयोग समाजासाठी करायच्या दृष्टीने एखादी गोशाळा, शैक्षणिक संस्था व रुग्णालय हे असणे अत्यंत जरुरीचे आहे, असे सांगून त्यांनी येथे असणारी पवित्रता शांतता ही आपल्या मनाला भावली असून येथे आल्याचे एक आत्मिक समाधान मिळाल्याचे त्यांनी सांगितले व दत्त देव संस्थान साठी कोणत्याही लोकोपयोगी कार्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असे नमूद केले.

यावेळी दत्त देव संस्थानचे अध्यक्ष वैभव काळू पुजारी, विश्वस्त पांडुरंग रुके त्यांच्या हस्ते श्री. व सौ. अर्लेकर यांचा दत्त प्रतिमा श्रीफळ प्रसादभेट देऊन सन्मान केला. यावेळी दत्त देवस्थान चे माजी अध्यक्ष दिगंबर शंकर पुजारी तेजस पुजारी तसेच भाऊसाहेब गेंडे, शेखर गुळवणी आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'गोकुळ'च्या अध्यक्षपदी नाविद मुश्रीफ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ चे चेअरमन अरुण डोंगळे यांनी राजीनामा दिल्यानंतर नवा अध्यक्ष होणार कोण याबद्दल चर्चा जास्त प्रमाणात रंगली. प्रथमच जिल्ह्याचे राजकारण मुंबई तसेच मंत्रालयातून रंगू लागले त्यामुळे स्थानिक नेत्याचा कस लागलाच. महायुती की महाविकास आघाडी आपले वर्चस्व कायम ठेवणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले होते. पहिल्यांदा शशिकांत पाटील-चुयेकर यांचे नाव अध्यक्षपदी चर्चेत होते. अशातच आज नाविद मुश्रीफ यांचे नाव अध्यक्षपदी पुढे येताच जिल्ह्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली. जेष्ठ संचालक विश्वास पाटील यांना एक बंद लिफाफा आमदार सतेज पाटील यांनी दिला आणि नाविद मुश्रीफ यांच्या निवडीवरती एकच शिक्कामोर्तब झाले.



नाविद मुश्रीफ यांच्या नावाची अध्यक्षपदी घोषणा होताच बहुचर्चित कोल्हापूर दूध संघ अर्थात गोकुळ च्या राजकारणात महायुतीची पकड स्पष्ट झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या निवडीचा प्रभाव राहील. नाविद मुश्रीफ यांच्या निवडीनंतर त्यांच्या कार्यकर्तात एकच जल्लोष करण्यात आला.

## 'राजारामबापू' २५ लाख ऊसाची रोपे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवणार : अध्यक्ष प्रतिकदादा पाटील



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

उत्पादन वाढीत शुध्द बियाणे हा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे आपण गेल्या २-३ वर्षापासून आपल्या साखर कारखान्या मार्फत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस रोपे पुरवठा करीत आहोत. यावर्षी आपण राजारामबापू साखर कारखान्यामार्फत २५ लाख रोपे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधा वर पोच करणार आहोत,असा विश्वास राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांनी व्यक्त केला. -(पुढील मजकूर पान ४ वर)-

## 'खोटं बोल पण रेटून बोल' ही आ.क्षीरसागरांची प्रवृत्ती : रवीकिरण इंगवले

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापुरातील गांधी मैदानात ७ ते ८ फूट पाणी साचत असलेल्या पाण्याचा प्रश्नाला आता राजकीय वळण लागले आहे. गांधी मैदानात साचत असणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी जवळपास पाच कोटींचा निधी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आ. राजेश क्षीरसागर यांनी महानगरपालिकेला दिला होता. मात्र हा निधी देऊन देखील पाण्याचा निचरा झाला नसल्याच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

यावेळी गांधी मैदानात प्रतिकात्मक बोट आणून चालवण्याचा प्रयत्न केला असता पोलीस प्रशासनाने या आंदोलनाला दडपण्याचा प्रयत्न केला. यावेळी आ.क्षीरसागर यांच्याविरूद्ध जोरदार घोषणाबाजी करण्यात आली असून त्यांच्या प्रतिकात्मक पोस्टर्सना काळे फासण्यात आले.



यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख रवीकिरण इंगवले म्हणाले की, 'खोटं बोल पण रेटून बोल' ही प्रवृत्ती अजूनही आमदार राजेश क्षीरसागर यांची सुटलेली नाही. पोलीस प्रशासनाला त्यांनी फौजफाट्यासह लावून दिले असल्याचेही रवीकिरण इंगवले म्हणाले.

यावेळी सुनील मोदी, विशाल देवकुळे, सागर साळोखे, रीमा देशपांडे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'एमआयटी एडीटी'च्या प्रा. केदारींची पदकांची हॅट्ट्रिक

### आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदकासह रचला इतिहास

**पुणे : हॅलो प्रभात**

थायलंडची राजधानी पट्टाया येथे झालेल्या आशियाई इनडोइअर रोइंग अजिंक्यपद स्पर्धेत येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या (एडीटी) मस्कुल ऑफ लॉफ्चे प्राध्यापक आदित्य रविंद्र केदारी यांनी पदकांची हॅट्ट्रिक पूर्ण करत भारतासाठी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली.

प्रा. केदारींनी २ किमी मास्टर मिश्र दुहेरी प्रकारात सुवर्ण, २ किमी पुरुष मास्टर्स एकेरी स्कल प्रकारात रौप्य आणि ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारात कांस्य मिळवत महाराष्ट्रासह विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

प्रा. केदारींनी स्पर्धेत सर्वप्रथम २ किमी पुरुष मास्टर्स एकेरी स्कल प्रकारात आव्हान देताना ६:२७.५ अशी वेळ नोंदवित रौप्य कामगिरी केली.

या गटात त्यांचा भारतीय सहकारी सिद्धार्थ याने (६:२५.१) याने सुवर्णपदक पटकाविले तर सौदी अरेबियाच्या हिशामने ६:४०.७ वेळेसह कांस्य पदक पटकाविले. यानंतर प्रा. केदारींनी २ किमी मास्टर मिश्र दुहेरी प्रकारात भारतीय सहकारी हरप्रित कौर यांच्यासह दमदार कामगिरी करताना आपली सुवर्णपदकाची भूक पूर्ण केली. त्यानंतर, ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारातही त्यांनी दमदार झुंज देत कांस्य पदकाला गवसणी घालताना एकाच स्पर्धेत तीन पदके जिंकून भारतासाठी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली.

प्रा. केदारी हे आशियाई स्पर्धेचे गतवर्षीचे ५०० मीटर मास्टर एकेरी प्रकारातले सुवर्णपदक विजेते आहेत. यंदा, पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय इनडोअर रोइंग स्पर्धेत रौप्यपदक पटकावल्यानंतर त्यांची भारतीय




रोइंग संघात निवड झाली होती.

भारतीय रोइंग संघटनेच्या (आरएफआय) अध्यक्ष राजलक्ष्मी सिंग देव यांच्याकडून संघातील निवडीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रा. केदारींनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या बोट क्लबमध्ये संदीप भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करताना, आपल्या वेळेत कमालीची सुधारणा केली. त्यामुळे, प्रा. केदारी हे सध्या पूर्णवेळ नोकरी करत आशियाई स्तरावर पदकांची हॅटट्रिक करणारे भारतातील एकमेव खेळाडू आहेत. तसेच, आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघात सलग दुसऱ्यांदा निवड झालेले ते महाराष्ट्राचे एकमेव खेळाडू देखील होते.

या कामगिरीनंतर माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र. कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड, स्कुल ऑफ लॉच्या अधिष्ठाता डॉ. सपना देव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.







# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

**हॅलो प्रभात**

**अहिल्यादेवींचा जन्म मे ३१ इ. स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते.**

### बालपण

अहिल्यादेवी यांचे आजोळ उस्मानाबाद जिल्ह्यातील चोराखळी हे गांव होते. त्याकाळी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही तिच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. बाजीराव पेशव्यांचे एक सरदार मल्हारराव होळकर हे माळवा प्रांताचे जहागीरदार होते. ते पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर यांचे इ.स. १७५४ मध्ये, कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. अहिल्याबाईंनी आपल्या राज्याला तुंगांपासून वाचवले. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

एका इंग्रजी लेखकाने अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ, मार्गारेट म्हटले आहे. (इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कथेरीन, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी केली आहे. (इ. स. १७२५ - इ.स. १७९५, राज्य कालावधी इ. स. १७६७ - इ.स. १७९५) ही भारतातील, माळव्याच्या जहागीरदार असलेल्या होळकर घराण्याच्या 'तत्त्वज्ञानी राणी' म्हणून त्या ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदातीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. राणी अहिल्यादेवी यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने उद्ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. त्यांना कल्याणकारी कामे करण्याची आवड होती

### उत्तम शासक

इ. स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा... कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा.

पूर्वीच त्या शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्याबाईंनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्याबाई सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्याबाईंनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्याबाईंनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्याबाई होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी अशी आहे : काशी, गया, सोमनाथ,अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्य कारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते.



**३१ मे : अहिल्याबाई होळकर जयंती**

अहिल्याबाईंनी जनतेच्या/रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्याबाईंच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्याबाईंनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून, सन १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी तिच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला. त्यांच्या स्मरणार्थ, इंदूर विद्यापीठास अहिल्याबाई होळकर असे नाव दिलेले आहे. भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. याही बाबतीत, (आंग्ल लेखक) 'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्याबाईंनी 'त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले'.

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागीर, मूर्तिकार व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणी पण सुरू केली.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील, भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही.

### संताचा दर्जा

अहिल्याबाई एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला.

### उत्तम राज्यकर्ती

ज्याप्रमाणे अकबर हा पुरुषांमधला उत्तम राजा तसेच अहिल्याबाई ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. जिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्याबाई ही एक महान स्त्री होती. आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्याबाईंनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्याबाईंना 'तत्त्वज्ञानी राणी' असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक 'तत्त्वज्ञानी राजा' भोज याच्याशी असावा.

### सूक्ष्म अवलोकनकर्त्या

अहिल्याबाई होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे : वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे.

या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्याबाईंना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार सर्व मिळत होते. बहुत काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची ने-आण करत असतांना लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी त्यांना त्यातून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्याबाई आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करी. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फानसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्याबाईंच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते. वयाच्या ७० व्या वर्षी अहिल्याबाई होळकरांची प्राणज्योत निमाली.

### अहिल्याबाईंची दूरदृष्टी

भारत स्वतंत्र झाल्यावरही पुढील अनेक वर्षे शेजारील भोपाळ, जबलपूर किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतीशील राहिले. याच्या मागे अहिल्याबाईंची दूरदृष्टी होती. अहिल्याबाईंच्या सन्मान व स्मृतिप्रीत्यर्थ भारत सरकारने ऑगस्ट २५, इ. स. १९९६ या दिवशी एक डाक तिकिट जारी केले. अशा या शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव 'देवी अहिल्याबाई विमानतळ' असे ठेवण्यात आले आहे आणि इंदूर विद्यापीठास 'देवी अहिल्या विश्वविद्यालय' असे नाव देण्यात आले आहे.

## संपादकीय

# 'आधी आरोप, मग वादंग अन् शेवटी संवाद' हीच भाजपाची मोडस ऑपरेंडी!

इंग्रजी दैनिकाच्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यातून तसेच ध्वनीत होत आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यापैकी कोण उत्तमरित्या संवाद साधू शकतो, असे देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आले. त्यावर त्यांनी दोघेही संवादात कमी पडत असल्याचे सांगितले आणि या स्पष्ट मताबद्दल दोघांकडे दिलगिरीही व्यक्त केली. याचप्रमाणे यावर्षी मान्सून कसा असेल, याचे भाकीत भारतीय हवामान खात्याबरोबरच स्कायमेटनेही वर्तविले आहे. पण महाराष्ट्रासह देशातील राजकारणाची समीकरणे कधी आणि कशी बदलतील, हे कोणालाच सांगता येणार नाही. गेल्या सहा वर्षांत राज्यातील नागरिकांनी याचा पुरेपूर अनुभव घेतला आहे आणि घेतही आहेत. २०१९ मध्ये ज्यांच्याविरुद्ध लढले त्यांच्याबरोबरच सत्ता स्थापन केल्याचा प्रकार सर्वांनीच पाहिला. त्यानंतर आपलाच पक्ष फोडून तो आपल्या नावावर करण्याचा अजब प्रकार करणारे साक्षीदार तमाम महाराष्ट्रीय नागरिक बनले. तर गेल्या महिन्यात म्हणजेच एप्रिलमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे एकत्र येण्याचे स्पष्ट संकेत मिळाले. आता वास्तवात ते कितपत खरे आहे, हा प्रश्नच आहे. एकूणच वारे कधी आणि कुठून वाहतील याचा काहीच अंदाज देता येणार नाही. फक्त एवढेच ठामपणे सांगता येऊ शकते की, भाजपा काहीही घडवू शकतो.

देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांनी आम्हाला धोका दिल्याचे म्हटले आहे. अशा परिस्थितीत राजकारणामध्ये हातावर हात ठेवून शांत बसता येत नाही. येथे मार्ग शोधून जिवंत राहावे लागते असे ते म्हणाले. मग २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजप आणि शिवसेनेची सुमारे २५ वर्षांची युती तोडण्यात आली याशिवाय २०१९ मध्ये शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देण्याचे वचन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते पण ते पाळले गेले नसल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला होता. हा धोका नव्हता का? २०१९ मध्ये शिवसेनेने महाविकास आघाडीचा नवा मार्ग शोधला होता हे मान्य करणार का? विशेष म्हणजे, फडणवीस यांनी या मुलाखतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचे कौतुक केले. निवडणुकीत जय असो वा पराजय शरद पवार हे आपले कार्य सातत्याने सुरूच ठेवतात असे फडणवीस म्हणाले. त्यातच दुसरीकडे शरद पवार समर्थक नेते भाजपात जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. त्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली असली तरी फडणवीस यांच्या संवादाची ही सुरुवात आहे का?

केवळ 'फेव्हिकॉलचा जोड आहे' असे म्हणावे लागते पण त्याचा तकलादूपणा न सांगताही दिसतो. विधानसभा निवडणुकीच्या वेळी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे श्रेय घेण्यात दोन्ही नेते आघाडीवर होते. पण निवडणुकीनंतर या योजनेचे निकष अधिक कठोर करून लाडक्या बहिणींची संख्या कमी करण्यास महायुती सरकारने सुरुवात केली. त्यासाठी आर्थिक नियोजनाची सबब अजित पवार प्रमुख असलेल्या अर्थ विभागाने दिली आहे. याशिवाय, शिंदे गटाच्याच दोन मंत्र्यांच्या खात्यातील निधी या योजनेसाठी वळविण्यात आल्याने दोन पक्षांतील धुसफूस चव्हाट्यावर आली होती.

मुळात, महाविकास आघाडी सरकारच्या काळात एकनाथ शिंदे यांच्याशी देवेंद्र फडणवीस यांनी कशा प्रकारे संवाद साधला याची तपशीलवार माहिती दस्तुरखुद्द एकनाथ शिंदे यांनीच २०२२ मध्ये राज्य विधिमंडळात दिली. रात्री उशिरा आमच्या भेटीगाठी व्हायच्या असे शिंदे म्हणाले होते. तर फडणवीस हे हुडी घालून रात्री उशिरा घराबाहेर पडत असत अशी माहिती त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना दिली होती. तर एकवेळ सत्तेशिवाय राहू पण राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर युती करणार नाही, असे त्रिवार सांगतानाच फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना, 'आपद्धर्म नाही, शाश्वत धर्म नाही, कुठलाही धर्म नाही' असे ठासून सांगितले होते. पण जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत सहभागी करून घेतलेच! बहुदा भाजपला अशाच प्रकारचा संवाद अपेक्षित असावा.

'आधी आरोप, मग वादंग अन् शेवटी संवाद' हीच भाजपाची मोडस ऑपरेंडी पाहायला मिळते. विविध पक्षांतील बडे नेते याच पद्धतीने भाजपच्या तंबूत गेल्याचे सर्वांनीच पाहिले. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे संवादात कमी पडत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले असले तरी हे दोन नेते एकमेकांशी संवाद कमी आणि कुरबूर जास्त करत असल्याचेही अनेकदा समोर आले आहे. महायुती सरकारमध्ये सर्वकाही आलबेल असल्याचे वरून कितीही दाखवले जात असले तरी 'दिसते तसे नसते' हेच खरे. बर्फ हा नेहमी नऊ दशांश पाण्याखाली असतो आणि एक दशांश वर दिसतो. या नऊ दशांश गोष्टी अशा असतात की त्यांची वाच्यता जाहीरपणे करता येत नाही.

# तंबाखू सेवनामुळे दरवर्षी १० लाख मृत्यू

*संपूर्ण जगात २०३० मध्ये मृत्यूची संख्या ८० लाखांवर पोहचेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तंबाखूच्या दुष्परिणामापासून लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी, यासाठी जागतिक आरोग्य संघटनेतर्फे ३१ मे हा दिवस 'जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो.*

**हॅलो प्रभात**

**तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने दरवर्षी जगात ५५ लाख तर भारतात १० लाख नागरिकांचा मृत्यू होतो. देशात प्रौढ व्यक्तींमध्ये तंबाखू खाणाऱ्यांचे व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्याचे प्रमाण अधिक असून आता हे लोन लहान मुलांमध्येही पोहोचले आहे. तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन, साठवणूक व विक्री करण्यावर राज्य शासनाने बंदी घातली असली तरी, योग्य अंमलबजावणी होत नसल्याने त्याचा 'फज्जा' उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.**

मूत्रपिंड, नाक, गर्भाशय, मुखाचा कर्करोग होतो. तंबाखूच्या सेवनाने त्यातील निकोटीनच्या प्रभावामुळे मेंदूचे कार्य थांबते. मेंदूची विचार करण्याची क्षमता कमी होते. तसेच जे लोक धूम्रपान करतात त्यांना हृदयघात होण्याची शक्यता अधिक असते. शासनाने तंबाखूच्या विरोधात अनेक कायदे केले असून त्याची अंमलबजावणी मात्र तंतोतंत



**३१ मे : जागतिक तंबाखू विरोधी दिन**

अंमलबजावणी होत नाही. तंबाखूच्या निर्मूलनासाठी सामाजिक समर्थनाची नितांत गरज आहे. निव्वळ कायदे करून प्रश्न सुटणारा नाही, तर समाजातील घटकाने याची जाणीव करून घेऊन दुसऱ्यांनाही त्याची जाणीव करून देणे गरजेचे असल्याचेही डॉ. कांबळे म्हणाले. महाराष्ट्र शासनाने एका आदेशान्वये सुगंधित तंबाखू, सुपारी, पानमसाला व गुटख्याचे उत्पादन, विक्री, साठवणूक, वाहतूक आणि वितरणावर बंदी घातलेली आहे. असे

## ...तर २०३० मध्ये मृत्यूची संख्या ८० लाखांवर पोहोचेल!

तंबाखूमधील अल्कोहोलाईड रसायनात कोटीनाईन, ॲन्टबीन, ॲनाबेसीन अशी रसायने असून भारतीय तंबाखूमध्ये मर्क्युरी, लेड, क्रोमियम, कॅडमियम आदी अतिविषारी रसायने सापडतात. या व्यतिरिक्त तंबाखूच्या धुरात व धुम्रपानात डीडीटी, बुटेन, सायनाईड, अमोनिया आदी रसायने आढळतात. तंबाखूमुळे तोंड, स्वरयंत्र, फुफ्फुस, गळा, अन्ननलिका, मूत्राशय, होताना दिसत नाही. त्यामुळे नियमांचे उल्लंघन होत आहे. कोवळी मने संस्कारक्षम असतात. मोठ्यांचे अवलोकन करून त्यांचे चांगले वाईट गुण विद्यार्थी अंगिकारतात. तेव्हा शिक्षकांनी तंबाखूच्या उच्चाटनासंदर्भात पुढे येणे गरजेचे आहे. तंबाखू शरीरासाठी कसा वाईट परिणाम करणारा आहे, याची सविस्तर माहिती अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे व ही चळवळ शाळा तसेच महाविद्यालयातून चालवणे आवश्यक आहे, असे मत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) कर्करोग विभागप्रमुख डॉ. के.एम. कांबळे यांनी बोलताना व्यक्त केले.

भारतात तंबाखूविरोधात कायदा असला तरी त्यासंदर्भात जाणीव तसेच जागरुकता समाजात निर्माण झाली नाही. कारण कायद्याची कठोर असतानाही या प्रतिबंधित वस्तू खुलेआम मिळत आहेत. त्यामुळे राज्य शासनाची बंदी कुचकामी ठरली आहे. जगात दरवर्षी ५.५ खरब सिगारेटचे उत्पादन होत असून कोट्यवधी लोक सिगारेट ओढतात. भारतात १० अरब सिगारेटचे उत्पादन होत असून ७२ कोटी ५० लाख किलो तंबाखूचे उत्पादन होत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक
हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए' , कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०

■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत) ■ **Email : ehelloprabhat@gmail.com**

■ सह संपादक : **सार्थक पाटील** ■ सल्लागार संपादक : **संजीव शाळगावकर** ■ मुख्य संपादक : **गणेश पाटील-सावर्डेकर**

# 'आषाढीवारीसाठी' जाणाऱ्या वाहनांना टोल माफी; राज्य सरकारचा मोठा निर्णय

पंढरपूर : हॅलो प्रभात





आषाढी वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना दोन माफी, राज्य सरकारचा मोठा निर्णय वारीसाठी जाणाऱ्या वाहनांना टोल माफी राज्य सरकारचा मोठा निर्णय. पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी राज्य सरकारकडून यंदाही मोठा निर्णय घेण्यात आला आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सरकारने विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे.

विशेषत: आषाढीवारीसाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय घेतला गेला असून दरवर्षीप्रमाणे यंदाही सुविधा लागू असणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत वारे बाबतच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. वारीच्या मार्गावर कुठेही रस्ते खराब असू नये यासाठी योग्य डागडुजी, मुरूम, खडी डांबरीकरण करण्याचे निर्देशही तातडीने देण्यात आले आहेत.

वारकऱ्यांसाठी संरक्षण, आरोग्य आणि सुविधा यंदाच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी समूह विमा योजना राबवले जाणार आहे, तसेच आरोग्य विभागाकडून आरोग्य शिबिर, कार्डिया म्बुलन्स तात्पुरती आय सी यु सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आंबेडकर स्वतः पंढरपूर येथे भेट देऊन या सुविधांचा आढावा घेणार आहेत.

नूडल ऑफिसर नेमण्यात येणार वारीदरम्यान पोलिसांसोबत समन्वय राखण्यासाठी निवडल ऑफिसर नेमण्यात आहे.

वीज पाणी वॉटरप्रूफ तंबू यासारख्या सुविधा पालखीतळावर पुरवण्यात येतील वारकऱ्यांची भोजन आणि पारंपरिक सोपस्कार वेळेत पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे.



# एनडीआरएफ पथकाने सतर्क राहून कामकाज करावे : जिल्हाधिकारी

सांगली : हॅलो प्रभात

संभाव्य पूरपरिस्थिती व आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकाने सतर्क राहून कामकाज करावे. संभाव्य पूरप्रवण भागाची, शहरी भागातील धोकादायक इमारती, दरडग्रस्त गावांची पाहणी करावी. मदत व बचाव कार्याच्या अनुषंगाने स्थानिक पूर्वमाहिती घ्यावी. लोकांमध्ये आपत्तीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी दिले.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमिवर जिल्ह्यात दाखल झालेल्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकाशी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी संवाद साधून मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पथक प्रमुख संतोषकुमार तिवारी, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अजय पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ व पथकातील जवान उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, आगामी मान्सून व नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमिवर जिल्हा प्रशासन सज्ज असून, बचाव व मदत कार्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकाची मदत महत्त्वाची ठरणार आहे. त्यांनी स्थानिक प्रशासन, पोलीस दल व संबंधित विभागाशी समन्वय ठेवून कामकाज करावे. आपत्कालिन परिस्थितीत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने त्वरित प्रतिसाद द्यावा.

जिल्हा प्रशासनामार्फत दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ठिकाणी मदतकार्य पोहोचविण्यासाठी त्यांच्या साधनसामुग्रीसह दक्ष राहण्याची खबरदारी घ्यावी, असे त्यांनी सूचित केले.

# डॉक्टरांनी इन्वेसिव्ह सर्जरीच्या माध्यमातून मुलाच्या मूत्रमार्गामधील मोठे खडे काढले

पुणे : हॅलो प्रभात

पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी ७ वर्षीय मुलावर यशस्वी उपचार केले, ज्याला वारंवार मूत्रमार्गाच्या संसर्गाचा त्रास होत होता, जसे की लघवी करताना जळजळ होणे आणि अनेक महिने पोटदुखीचा त्रास. गेल्या वर्षी या मुलाने अनेक हॉस्पिटल्समध्ये उपचार केला आणि त्याला तात्पुरता आराम मिळाला. रुग्णाला खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले आणि डॉक्टरांना आढळून आले की त्याच्या मूत्रमार्गात मोठे खडे आहेत.

बाहेरून केलेल्या अल्ट्रासाऊंडमध्ये डावीकडील खालच्या मूत्रमार्गात १२ मिमीचा खडा आढळून आला आणि ओपन सर्जरी करण्याचा सल्ला देण्यात आला. खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील युरोलॉजी सल्लागार डॉ. अंकित शर्मा यांच्या नेतृत्वाखालील टीमने केलेल्या सीटी केयूबी स्कॅनमध्ये हे दुर्मिळ निदान झाले. मूत्रवाहिनी आणि मूत्रमार्ग दोन्हीमध्ये मोठ्या कॅल्क्युली (मोठ्या कॅल्क्युली म्हणजे १० मिमी पेक्षा जास्त आकाराचे मूत्रमार्गातील खडे, जे

manipalhospitals
LIFE'S ON

लघवीचा प्रवाह रोखू शकतात आणि त्वरित उपचार न केल्यास मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात) असल्याचे दिसून आले. बाल वयोगटातील ही असामान्य घटना आहे. मुलाला यापूर्वी मूत्रमार्गातील खडे काढण्यासाठी ओपन सर्जरीचा सल्ला देण्यात आला होता. पण, टीमने सुरक्षित आणि किमान इन्वेसिव्ह पद्धतीचा अवलंब केला.

# शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंबाला आर्थिक ताकद मिळवून द्या

## प्रा. शामराव पाटील यांचे आवाहन

इस्लामपूर : हॅलो प्रभात

१० वी,१२ वीचा एक टप्पा पूर्ण केल्यानंतर इथून पुढे अधिक मन लावून अभ्यास करा आणि चांगले शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभा रहा. शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाला भक्कम आर्थिक ताकद मिळवून देत आपल्या कुटुंबाची समाजातील पत वाढविण्याची आपणास मोठी संधी उपलब्ध आहे,याचे कायम भान ठेवा, असे आवाहन राजारामबापू ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील यांनी इस्लामपूर येथे विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना केले.

येथील राजारामबापू ज्ञान प्रबोधिनीच्या सभागृहात जयंत दारिद्र्य निर्मुलन अभियान च्या वतीने १० वी,१२ वीच्या विद्यार्थी- विद्यार्थिनींना



पुढील करिअरबद्दल मार्गदर्शन करताना प्रा.पाटील बोलत होते. पुणे येथील एका फाउंडेशन सर्व्हिसेसचे डॉ.मुनकीर मुजावर,कोल्हापूर येथील प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या नंदाताई रोकडे, नेर्ले गावचे सरपंच संजय पाटील, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने, शहराध्यक्षा पुष्पलता खरात, जयंत दारिद्र्य अभियानाचे समन्वयक इलियास पिरजादे, प्रा.सर्जेराव कचरे, सद्गुरु आश्रमशाळेचे महेश जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी डॉ.मुनकीर मुजावर यांनी १० वी, १२ वीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी कोण-कोणत्या शाखेत प्रवेश घेऊ शकतात? आणि त्यातून नोकरी अथवा व्यवसायाच्या कशा संधी मिळू शकतात? याचे सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच नंदाताई रोकडे यांनी प्रथम एज्युकेशन मार्फत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक संधीची माहिती दिली. प्रारंभी अभियानाचे समन्वयक इलियास पिरजादे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उज्वला पाटील, विकास कुलकर्णी, सुरेंद्र बांदल, श्रीरंग नाईक, सागर पवार, अनिल जाधव, दीपक चव्हाण यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटक संदीप साठे यांनी आभार मानले. सचिन मुळीक यांनी सूत्रसंचालन केले.

# नगर-मनमाड पुणतांबा चौफुली परिसरात दुरुस्ती करा

## अन्यथा तीव्र आंदोलन : वैभव आढाव

कोपरगांव : हॅलो प्रभात

कोपरगाव शहरालगत असलेल्या पुणतांबा चौफुलीजवळील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाले आहेत. या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांचे जिवित धोक्यात आले आहे. नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका महिलेस आपला प्राण गमवावा लागल्याच्या पार्श्वभूमीवर, भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांच्यावतीने संबंधित विभागाकडे तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.



एकीकडे मतदार संघाच्या विकासाचा भ्रमनिरास दिवसेंदिवस लोकप्रतिनिधी करत आहेत. कोट्यवधीच्या वल्गना झाल्या पण दुर्दैवाने कामे अतिशय निकृष्ट असल्याचा प्रकार समोर येतो आहे. या अपघातांचे दायित्व लोकप्रतिनिधींनी घ्यावे कारण त्यांच्या उदासीन धोरणामुळे सदर दुर्दैवी वेळ मतदारसंघाच्या नागरिकांना भोगावी लागते आहे याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. या स्थितीमुळे शहराध्यक्ष वैभव यांनी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांना पत्रव्यवहार केला आहे.

या निवेदनात पुणतांबा चौफुली परिसरातील रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहनांची वाहतूक अडथळाग्रस्त होत असून, अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पावसामुळे अधिक प्रमाणात अनेक वेळा दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांना या खड्ड्यांमुळे धोका निर्माण झाला आहे.

### तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल

तरी रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवून साईडपट्टीसह वाहतुकीसाठी सुरक्षित व्यवस्था करण्यात यावी आणि या संपूर्ण परिस्थितीची योग्य चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्तरदायित्व निश्चित करण्यात यावे, अशी मागणी आढाव यांनी केली आहे. जर दहा दिवसांत कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही तर, भाजपा कोपरगाव शहराच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# 'नरेंद्र मोदी विचार मंच'च्या तालुका अध्यक्षपदी मनोहर ढवळे यांची निवड

नृसिंहवाडी : हॅलो प्रभात



येथील भारतीय जनता पार्टीचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते कुलदीप मनोहर ढवळे यांची नरेंद्र मोदी विचार मंच (आंतरराष्ट्रीय संत बौद्धिक मंच, महाराष्ट्र राज्य) यांची शिरोळ तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

शिरोळ तालुका अध्यक्षपदाच्या निवडीचे पत्र नरेंद्र मोदी विचारमंचचे राष्ट्रीय अध्यक्ष रवीजी चाणक्य तसेच आंतरराष्ट्रीय बौद्धिक मंच हे राष्ट्रीय अध्यक्ष सुरज ब्रह्मे यांच्या सहमतीने नुकतेच देण्यात आले आहे.

या नियुक्ती पत्रावर नरेंद्र मोदी विचार मंचचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री यमराजजी खरात यांच्या सहीने देण्यात आले आहे.

या नरेंद्र मोदी विचार मंचचे राष्ट्रीय संघटन महामंत्री म्हणून स्वामी बालकानंद जी महाराज तर राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून महंत विनोदरावजी योगी हे काम पाहत आहेत.

# दत्त दालमिया आसुर्ले पोर्ले कारखान्यात मिल रोलर पूजन

पन्हाळा : हॅलो प्रभात

आसुर्ले पोर्ले (ता.पन्हाळा) येथील श्री दत्त दालमिया भारत शुगर कंपनी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी मिल रोलरचे पूजन युनिट हेड एस रंगाप्रसाद यांच्या




शुभहस्ते व संतोष कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कारखान्यात विधिवत सत्यनारायण पूजा करून सर्व खाते प्रमुख व कर्मचारी यांच्या हस्ते पुजा करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या आणि कारखाना कर्मचारी आणि ठेकेदार यांच्या सहकार्यामुळे मागील गळीत हंगामात चांगले गाळप करण्यात आले. तसेच पुढील गळीत हंगामातील गाळपाचे अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला सर्व ऊस दालमिया कारखान्याला पाठवून सहकार्य करण्याचे आवाहन युनिटहेड एस रंगाप्रसाद यांनी मिल रोलर पूजन प्रसंगी केले.

यावेळी चिफ इंजिनिअर शिवप्रसाद पडवळ, एचआर प्रमुख सुहास गुडाळे, शेती अधिकारी संग्राम पाटील, असि.शेतीअधिकारी शिवप्रसाद देसाई, संभाजी भोसले, चिंतामणी पाटील, बबन रेपे, मणिकंदण, मनिष अगरवाल, इंद्रजीत जाधव, रामचंद्र घराळ, निलेश पाटील, विलास शिंदे, एम. एम.पाटील, प्रकाश चौगुले यांच्यासह कंपनीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पाणी संघर्ष समितीचा कडेगाव पोलीस स्टेशनवर मोर्चा

## रेड्डीयार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

देवराष्ट्रे : संदेश जाधव

कडेगांव शहरासह तालुक्यातील काही वंचित गावांना अनेक आंदोलने करुन सुध्दा उन्हाळ्यातील मार्च, एप्रिल, मे महिन्यात दरवर्षी टेंभू योजनेचे पुरेसे पाणी मिळत नाही. टेंभू अभियंता राजन रेड्डीयार यांनी कडेगाव तलावात बंदिस्त पाईप लाईनने पाणी मिळेल, सुरली व कामती, आवर्तन ज्यादा अश्वशक्तीचे पंप वापरून एकाचवेळी सुरू करू तसेच प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन ऑगस्ट २०२४ ला दिले होते पण दिलेल्या तारखां उलटून



गेल्या तरी टेंभू योजनेची कामे सुरू केली नाहीत व निधी मंजूर केला नाही. शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पुरेसे पाणी न देता त्यांच्या समस्या प्रलंबित ठेवल्या आहेत. शेतकऱ्यांना दरवर्षी पाण्यासाठी भटकंती व भिख मागावी लागते हे कडेगांव शहरासह तालुक्याचे दुर्दैव आहे. त्यामुळे भ्रष्ट टेंभू अभियंता राजन रेड्डीयार यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा अन्यथा आम्हाला ५ जून रोजी भूसमाधी घेण्याची परवानगी द्यावी असे निवेदन पोलीस निरीक्षक उदयसिंह काळे याना देण्यासाठी पाणी संघर्ष समितीने कडेगाव पोलीस स्टेशन वर मोर्चा काढला व रेड्डीयार यांच्या विरोधात घोषणा दिल्या.

यावेळी पाणी संघर्ष समिती अध्यक्ष डी एस देशमुख, क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड यांचे वारसदार किरण तात्या लाड, पाणी संघर्ष समिती संयोजक अभिमन्यू वरूडे शिवराज पटेल, संतोष डांगे, संजय तडसरे, जीवन करकटे, प्रविण करडे, संभाजी यादव,राजेंद्र माने, नवनाथ काकडे, सोमनाथ पवार, संजय पाटील, शिवाजी माळी, सुनिल गाढवे, प्रमोद मांडवे, बाळासाहेब वत्रे, यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# बुधवार पेठेतील नॅशनल हायवे वाहतूक बंद करा : सुशील भांदिगरे

कोल्हापूर : हॅलो प्रभात

सी.पी.आर.चौक ते छत्रपती शिवाजी पूल येथील अंतर्गत वाहतूक खानविलकर बंगला मार्गे पंचगंगा स्मशानभूमी नविन मार्ग तयार करुन जुना बुधवार पेठेतून जाणारा नॅशनल हायवे वाहतूक बंद करावा. जुना बुधवार पेठेमधून नॅशनल हायवे जात असून हा रस्ता रत्नागिरीला जोडणारा महामार्ग आहे. याठिकाणी अनेक लोक उदरनिर्वाहासाठी तसेच पर्यटनासाठी या रस्त्याचा वापर अधिक प्रमाणात होत असून लाखो वाहने या रस्त्यावरुन दररोज ये-जा करत असतात. सी.पी.आर चौक ते जुना बुधवार तालीम तसेच छत्रपती शिवाजी पूल या मार्गावर दाट नागरी वस्ती असल्याने येथील लोकांना रस्ता ओलांडता येत नाही. त्यात रस्ता अरुंद आहे. वाहतूक कोंडी मोठया प्रमाणात होते.

सकाळी ७.०० ते ११.०० व सायंकाळी ६.०० ते ९.०० या वेळेत ग्रामीण भागातील नोकरीसाठी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची संख्या अधिक असल्याने कायम वर्दळ या रस्त्यावर असते. त्यामुळे जुन्या बुधवार पेठेतील नागरीकांना या रस्त्यावर मुक्त श्वासाने फेरफटका मारता येत नाही. आता नव्याने तावडे हॉटेल ते सी.पी. आर चौक तसेच शिवाजी पूल या मार्गावरील उड्डाणपूल व अंतर्गत मार्ग तयार करण्याचे नवा डी.पी.आर होत आहे. यामध्ये जुना बुधवार पेठ नागरीकांकडून सी.पी.आर चौक ते खानविलकर बंगला ते पंचगंगा मार्ग तयार करण्यात यावा याबाबत सुशील भांदिगरे, गणेश जाधव, किसन पाटील, मधुकर पाटील, शशिकांत जाधव, संतोष दिंडे, शशिकांत हळदकर यांनी आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.



# रस्त्यावर लावलेल्या सपोर्ट खांबामुळे धोका

## वीज वितरण कंपनी उठली शेतकऱ्यांच्या जीवावर

दौंड : हॅलो प्रभात

दौंड तालुक्यातील कासुर्डी ते भरतगाव, डाळींब, शिंदवणे रोडवरील मार्गावर लावलेला सपोर्ट खांब वाहनधारक आणि शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. कासुर्डी तलावाच्या बाजूने कोणत्याही प्रकारची संरक्षक भिंत नसल्याने आणि सपोर्ट म्हणून अरूंद रस्त्यावर लावलेल्या खांबाचे अंतर वाढल्याने या ठिकाणी भविष्यात मोठा अपघात घडू शकतो. महावितरण कार्यालयाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. सपोर्ट म्हणून लावलेला खांब कधीही रस्त्यावर किंवा येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांच्या किंवा शेतकऱ्यांच्या अंगावर पडेल याची शाश्वती देता येत नाही. कारण सपोर्ट म्हणून लावलेला खांब सुद्धा जमीनीत जास्त गाडलेला नाही.



विद्युत महावितरण कंपनीला गांभीर्य काय एखाद्याचा जीव गेल्यावर संबंधित खात्याला जाग येईल काय ? असा संतप्त सवाल वाहनधारकांसह शेतकऱ्यांनी केला आहे. अरुंद रस्त्यावर सपोर्ट म्हणून लावलेला खांब रस्त्याच्या बाजुला आहे व रस्त्याने रोज विद्यार्थी व नागरिक तसेच शेतकरी ये-जा करीत असतात. अशावेळी सपोर्ट खांब कोसळला तर मोठा अनर्थ होऊ शकतो यास जबाबदार कोण? असा प्रश्न यावेळी नागरिक करतांना दिसत आहे.




## गांधी मैदानाचे आंदोलन म्हणजे निव्वळ स्टंटबाजीचा प्रकार : सुजितभाऊ चव्हाण

### समाजकंटक टोळक्याकडून कामात खो घालायचेच उद्योग

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गांधी मैदानाच्या निचरा मार्गात जाणून बुजून अडथळा निर्माण करायचा. स्वतःच्या स्टंटबाजी साठी कोल्हापूरची अस्मिता असणाऱ्या गांधी मैदानाचे नुकसान करायचे आणि नेहमीच या मैदानाचा प्रसिद्धीसाठी वापर करायचा, हेच उद्योग सद्या एका समाजकंटक टोळक्याकडून सुरु आहेत. गांधी मैदानाचे आंदोलन म्हणजे निव्वळ स्टंटबाजीचा प्रकार असून, याच टोळक्याकडून गांधी मैदानाच्या विकास कामात खो घालायचे, काम जाणूनबुजून बंद पाडायचे उद्योग सुरु असल्याचा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण यांनी केले.



गांधी मैदानाच्या कामाबाबत शिवालय, शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय, शनिवार पेठ, कोल्हापूर सविस्तर माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

याबाबत माहिती देताना जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण म्हणाले, गांधी मैदानाबाबत सातत्याने घडणाऱ्या या घटनेमुळे हजारो खेळांडूचे नुकसान होत असून, शासकीय मालमत्तेचेही नुकसान होत आहे. तसेच शहरात अशांतता व संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यामध्ये शकुनीमामा असणाऱ्या टोळी प्रमुखावर आणि टोळीवर कारवाई करावी अशी मागणीही शिवसेनेच्या वतीने जुना राजवाडा पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसात संथगतीने सुरु असलेल्या कामास गती देण्यात आलेली आहे. हे ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर मैदानात पाणी साठण्याचे प्रमाण नक्कीच बंद होणार आहे. त्यामुळे स्टंटबाज टोळक्यालाही लवकरच स्वप्नपूर्ती झालेली पहायला मिळेल, असा उपहासात्मक टोलाही जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण यांनी लगावला.

या पत्रकार परिषदेस उपजिल्हाप्रमुख किशोर घाटगे, तुकाराम साळोखे, रमेश खाडे, दीपक चव्हाण, रणजीत मंडलिक, सुनील खोत, कमलाकर किलकिले, अर्जुन आंबी, अमृत परमणे, बंटी साळोखे आदी उपस्थित होते.

## कोल्हाटी समाजाच्या न्यायहक्कासाठी निशिकांत पाटील यांचा पुढाकार

### कृषी उत्पन्न बाजार समितीत घेतला आढावा

**इस्लामपुर : हॅलो प्रभात**

उरुण-इस्लामपुर शहरातील कोल्हाटी समाज बांधव यांना हक्काची जागा आणि घर मिळायला हवे होते, हा समाज आज न्यायाच्या प्रतिक्षेत आहे, या समाजबांधवांना लवकरच त्याचे स्वतः चे हक्काचे घर मिळेल,शासनदरबारी आवश्यक असणारी सर्व ती मदत करणार असुन याबाबत लवकरच निर्णयात्मक बैठक शासन दालनात घेण्यात येईल,असा विश्वास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सांगली जिल्हा अध्यक्ष निशिकांत भोसले- पाटील यांनी कोल्हाटी समाज बांधवांना दिला.

निशिकांत भोसले- पाटील यांनी इस्लामपुर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये जाऊन कोल्हाटी समाज बांधव व कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासन यांची कोल्हाटी समाजबांधवांच्या हक्काची जागा व घर याबाबत बैठक घेतली,यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विजय जाधव,माजी नगरसेवक वैभव पवार ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय लाखे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी निशिकांत भोसले-पाटील यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कोल्हाटी समाज बांधवांच्या हक्काची जागा आणि घराबाबत का सकारात्मक नाही याबाबत प्रशासनाला जाब विचारला, सकारात्मक निर्णय तात्काळ घेण्याच्यादृष्टीने कृषी उत्पन्न बाजार समितीने शासनस्तरावरील कार्यवाही तात्काळ करावी या प्रश्नात राजकीय हेवेदावे बाजुला ठेवुन या समाजबांधवांना न्याय द्यावा,कोल्हाटी समाजबांधव जवळपास ८९ वर्षापासून येथे राहत आहे. राजकारण बाजूला ठेऊन सर्वांनी कोल्हाटी समाजाला मदत करण्याची भूमिका ठेवावी,शासनस्तरावर लागेल ती मदत होईल. असा विश्वास देत कोल्हाटी समाजबांधवांच्या न्यायासाठी निशिकांत भोसले -पाटील यांनी खंबीर भुमीका घेतली. निशिकांत भोसले पाटील यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सांगली जिल्हाध्यक्ष पदी निवड झालेबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सचिव विजय जाधव,संचालक संजय लाखे यांनी सत्कार केला.

यावेळी कोल्हाटी समाजाचे प्रमुख वसंत जावळे, विलास जावळे, भिमराव जावळे, शंकर जावळे, यशवंत जावळे, लहू जावळे, सुरेश जावळे, किरण लाखे, रामलिंग लाखे, कोंडीराम जावळे, सागर जावळे, राजेंद्र लाखे आदिसह अन्य मान्यवर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

## वांगीचे प्राथमिक आरोग्य केंद्र घाणीच्या विळख्यात

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा आंदोलनाचा इशारा

**वांगी : हॅलो प्रभात**

वांगी (तालुका कडेगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून आरोग्य केंद्राच्या आजूबाजूचा परिसर घाणीच्या विळख्यात सापडला आहे. झाडे-झुडपे प्रचंड प्रमाणात वाढली असून आरोग्य केंद्राच्या आवारात साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीचे आजार



पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीकडे जिल्हा परिषद प्रशासन पूर्णतः दुर्लक्ष करत असल्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कडेगाव तालुका अध्यक्ष विशाल शिंदे यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**तर तीव्र आंदोलन छेडावे लागेल**

यावेळी विशाल शिंदे यांनी जनतेच्या आरोग्यासाठी आम्हाला आपल्या विरोधात तीव्र आंदोलन छेडावे लागले तरी चालेल. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी. याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत निकृष्ट दर्जाची बांधलेली असून इमारतीतून पाणी गळती होत आहे. केंद्राच्या आतमध्येही कचऱ्याचा मोठा साठा झालेला आहे.

स्वच्छतागृहे पूर्णपणे निष्क्रिय स्थितीत आहेत. ही परिस्थिती जनतेच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण करणारी आहे. त्यामुळे आम्ही जिल्हा परिषद प्रशासनाकडे जोरदार मागणी करतो की त्यांनी त्वरित या आरोग्य केंद्राची स्वच्छता करून योग्य ती दुरुस्ती करावी. अन्यथा जनतेच्या आरोग्यासाठी आम्हाला आपल्या विरोधात तीव्र आंदोलन छेडावे लागेल, याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी असा इशारा दिला आहे.

## आर्थिक वर्ष २०२४-३५ मध्ये इफकोची दमदार कामगिरी

### नॅनो खतांची विक्री ४७% ने वाढली

**नवी दिल्ली : वृत्तसेवा**

जगातील अग्रणी सहकारी संस्था असलेल्या इफकोने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रु. ३,८११ कोटी इतक्या करपूर्व नफ्याची (पीबीटी) म्हणून नोंद केली असून, नॅनो खतांच्या विक्रीत ४७% वाढ झाली आहे. या आर्थिक वर्षात (२०२४-२५) इफकोने नॅनो खतांच्या एकूण ३६५.०९ लाख बाटल्यांची विक्री केली, तर मागील आर्थिक वर्षात (२०२३-२४) ही संख्या २४८.९५ लाख होती. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये इफकोची एकूण उलाढाल रु. ४१,२४४ कोटी इतका नोंदविण्यात आली.

इफकोचे अध्यक्ष दिलीप संघानी म्हणाले की, इफकोने घवघवीत वाढ नोंदवली असून, मसहकार से समृद्धिफ या स्वप्नाला मूर्त स्वरूप देत असल्याचा देशातील संपूर्ण सहकारी क्षेत्राला अभिमान वाटावा अशी ही कामगिरी आहे.

ते पुढे म्हणाले की, सलग तीन आर्थिक वर्षांपासून संस्थेने रु. ३,००० कोटींपेक्षा अधिक नफ्याची नोंद केली आहे. तसेच, गेल्या २३ वर्षांपासून इफकोने आपल्या सभासदांना भरणा झालेल्या भागभांडवलावर (पेड-अप कॅपिटल) दर वर्षी २०% लाभांश दिला आहे.

## सीमापार वाढत्या सायबर धोक्यांना बसणार आळा

### क्विक हीलचे विनामूल्य ‘अँटीफ्रॉडडॉटएआय’ फ्रीमियम मॉडेल

**मुंबई : हॅलो प्रभात**

सीमापार येणाऱ्या सायबर धमक्यांचे प्रमाण वाढत असताना व नागरिकांच्या डिजिटल खाणाखुणाही वाढत्या प्रमाणात सर्वदूर पसरत असताना सायबरसुरक्षेच्या क्षेत्रातील भारतातील

Quick Heal

सर्वात विश्वासार्ह नाव असलेल्या क्विक हील टेक्नोलॉजिज लिमिटेडने अँटीफ्रॉडडॉटएआय या फसवणूकीला प्रतिबंध करणाऱ्या प्रमुख उपाययंत्रणेची फ्रीमियम आवृत्ती विनामूल्य उपलब्ध करून दिली आहे. सायबर जगातील घडामोडी, विशेषतः गंभीर स्वरूप धारण करत असलेल्या इंडो-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर हा धाडसी व समयोचित निर्णय घेण्यात आला आहे, जिथे प्रत्यक्ष सीमारेषेइतकेच डिजिटल आघाडी सांभाळणेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

AntiFraud.AI च्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य म्हणजे केवळ फोनवर दिसणारे घातक ॲप्सच नव्हे तर लपलेले किंवा अदृश्य ॲप्सही शोधून काढण्याची अनोखी क्षमता, ज्यामुळे हे ॲप सायबरसुरक्षा क्षेत्रामध्ये वेगळे ठरते. ही छुपी ॲप्स बरेचदा यूजरच्या अपरोक्ष काम करत असतात व फिशिंग, स्पायवेअर व आर्थिक फसवणूकीच्या हल्ल्यांमध्ये त्यांचा वापर करून घेतला जातो.

## संजीवनी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी संधान व नाईकवाडे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान आणि प्रसिद्ध युवा उद्योजक महेंद्र नाईकवाडे यांची निवड करण्यात आली आहे.

दोन्ही नविन संचालकांची निवड संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, त्यांच्या माध्यमातून संस्थेच्या कार्यात नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नूतन संचालकांचा सत्कार संस्थेचे



चेअरमन प्रदीप नवले व उपाध्यक्ष संदीप गुरुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माजी उपाध्यक्ष राजेंद्र परजने, संचालक राजेंद्र बागुल, अनंत पाटील बडवर, श्रीकांत चांदगुडे, गणपत राऊत,जयराम सांगळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.व्ही. रोहमारे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

संजीवनी सहकारी पतसंस्था ही माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी दूरदृष्टीने शेतकरी, कामगार, ठेवीदार आणि व्यापारी वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्थापन केलेली एक महत्वाची आर्थिक संस्था आहे. या संस्थेने गेल्या काही दशकांपासून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेसाठी मोलाचे योगदान दिले आहे.

नवीन संचालक पराग संधान हे अमृत संजीवनीचे यशस्वी नेतृत्व करत असून त्यांचा अनुभव आणि दूरदृष्टी संस्थेस लाभदायक ठरेल. तर महेंद्र नाईकवाडे हे युवा पिढीतील यशस्वी उद्योजक असून त्यांनी उद्योगक्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

नवीन संचालकांची निवड झाल्यानंतर संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार सौ.स्नेहलताताई कोल्हे आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी दोघांचे हार्दिक अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ‘राजारामबापू’ २५ लाख ऊसाची रोपे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवणार : अध्यक्ष प्रतिकदादा पाटील

**(पान १ वरून)** प्रतिकदादा पाटील यांनी तांबवे,धोत्रेवाडी, येवलेवाडी गावांचा संपर्क दौरा करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला,त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.माजी जि.प. अध्यक्ष,कारखान्याचे संचालक देवराज पाटील,अतुल पाटील,कृष्णेचे संचालक लिंबाजी पाटील, ब्रम्हानंद पाटील, डॉ. अशोक पाटील, राजारामबापू दूध संघाचे संचालक पोपट जगताप, विजयकुमार नलवडे, राजारामबापू बँकेचे माजी संचालक रामभाऊ माळी, मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील, सचिव डी. एम. पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. या दौऱ्यात प्रतिकदादा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी,प्रश्न ऐकून घेतले. त्यातील शक्य असणाऱ्या प्रश्नांचे जागेवर निराकरण केले. उर्वरित प्रश्न त्यांनी स्वतः लिहून घेतले. धोत्रेवाडी येथे वनश्री सुरेश माळी,माधवी विजय ताटे यांना अहिल्याबाई होळकर पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. प्रतिकदादा पाटील म्हणाले,आपल्या गावात ज्या परिसरात क्षारपड जमिनीचा प्रश्न आहे,त्या परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सच्छिद्र पाईप निचरा प्रणाली योजनेचा लाभ घ्यावा. आपण गाताडवाडी येथे हा प्रकल्प राबवित असून दुसऱ्या टप्प्यात बोरगाव येथे हा प्रकल्प राबवित आहोत. याकामी जो खर्च येईल, त्याची परतफेड आपल्या वाढीव उत्पादनातून होऊ शकतो. ज्या भागात पाण्याची कमतरता आहे,त्या भागात आपण ठिबक सिंचनची योजना देत आहोत. आपण कारखान्याच्या विविध योजनांची माहिती करून घ्यावी आणि त्याचा लाभ घ्यावा. देवराज पाटील म्हणाले, राजारामबापू साखर कारखान्याने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. कोरोना काळात आपल्या तिन्ही गावातील ऊस मोठ्या प्रमाणात शिल्लक होता. इतर कारखाने टोळ्या घेऊन निघून गेले. मात्र हा ऊस आपल्या राजारामबापू साखर कारखान्याने नेला आहे. आपले तीन पिढ्यांचे नाते आहे, ते आपण जपूया.

## वृक्षाविना निसर्ग नाही : निसर्गाविना जीवन नाही

**हॅलो प्रभात**

**प्रा. डॉ. सागर गावंडे**
(अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग अँड रिसर्च, पर्वती-पुणे)

**आज आपण एका ‘गंभीर वळणावर...’ उभे आहोत. मानवी प्रगतीच्या नावाखाली चाललेला निसर्गाचा संहार आता आपल्या दैनंदिन जीवनावर भयंकर परिणाम घालतोय. हवामान बदल, अनियमित पावसाळा, दुष्काळ आणि पूर यांसारख्या संकटांच्या साखळीत सामान्य माणूस जीवितासाठी झुंजतोय. या सगळ्याचा मूळ कारण आहे झाडांची घटती संख्या आणि पर्यावरणीय संतुलनाचा बिघाड.**




झाडे म्हणजे निसर्गाचे फुफ्फुसे आहेत. झाडे जिवंत राहिली तर निसर्ग टिकेल, निसर्ग टिकला तरच मानव टिकेल. आज माणूस जितका स्मार्ट तंत्रज्ञानात प्रगती करत आहे, तितकाच तो निसर्गापासून दूर जात आहे. आपण उभे केलेले सिमेंटचे जंगल झाडांची जागा घेत आहे, पण त्याचबरोबर आपल्याकडून गमावली जाते प्राणवायू, स्वच्छ हवा, थंडगार सावली, पक्ष्यांचे गाणे आणि मनाला दिलासा देणारा हिरवळ. झाडांचे महत्त्व फक्त श्वसनापुरते मर्यादित नाही. झाडे पर्जन्यमान नियंत्रित करतात, भूजल साठवतात, तापमान कमी करतात आणि प्रदूषणावर नैसर्गिक नियंत्रण ठेवतात.

झाडे नसल्यास वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढते, ज्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग वाढते. याचा परिणाम थेट शेती, अन्नसुरक्षा, जलसंपत्ती आणि मानव आरोग्यावर होतो. शोभेची प्लास्टिकची झाडे किंवा व्हर्च्युअल झाडे कधीच प्राणवायू देऊ शकत नाहीत. झाडांना आपली गरज नाही तर आपल्यालाच झाडांची जास्त गरज आहे आणि जर आपण याकडे दुर्लक्ष केले, तर उद्याचं चित्र केवळ धूसर नव्हे, तर भयावह ठरू शकते.

आज प्रत्येक गाव, शहर, वस्तीत मोठमोठे वृक्ष झपाट्याने कमी होत आहेत. विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोडी आपलं भवितव्य धोक्यात घालतेय. शहरांमधील तापमान वाढतेय कारण हिरवळ नाही, सावली नाही, ओलावा नाही. झाडे नसल्यामुळे पक्षी, मधमाश्या, फुलपाखरे यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. जैवविविधतेचे हे नुकसान म्हणजे निसर्गाचा पाया सडत चालला आहे. याचं उत्तर आहे वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन. झाडे लावणे ही सामाजिक सेवा नाही, तर प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक आणि राष्ट्रीय जबाबदारी आहे. एक झाड लावणे आणि ते जपणे हेच खरे समाज प्रेम व राष्ट्रप्रेम आहे. झाडांची वाढ जमिनीत मुळे रोवण्यात नाही, तर मनातही झाडांविषयी प्रेम आणि कर्तव्यभावना रुजवण्यात आहे. झाडं आपल्याला वृक्ष वाटतात, पण ते आपल्या जीवनाचे आधारस्तंभ आहेत. संत तुकाराम म्हणतात - वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे. ही नाती शब्दांत न राहता कृतीत उतरवण्याची आज वेळ आली आहे.

एक झाड म्हणजे पर्यावरणाचा सैनिक. त्याच्या सावलीत लहान मुले खेळतात, वृद्ध विश्रांती घेतात, पक्षी घरटी बांधतात आणि कीटक परागीकरण करून अन्नसाखळी टिकवतात. शहरातील नगरपालिका, ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालये, कारखाने आणि सर्वसामान्य नागरिकांनी मिळून हरित क्रांती घडवावी लागेल. एक घर - एक झाड, एक विद्यार्थी - एक रोप, सण साजरा - वृक्षारोपणाचा उपक्रम असे अभियान निष्ठेने राबवायला हवेत. हे उपक्रम फक्त फोटोसाठी नसून, झाड जपण्यासाठी असावेत. झाडे लावणे सोपे आहे, पण ती जपणे - हे खरे कर्म, धर्म आणि संस्कार आहे.

समाजात झाडांचे महत्त्व प्रत्येक स्तरावर समजावून सांगणे गरजेचे आहे. बालवाड्यांपासून ते विद्यापीठांपर्यंत, शेतकरी ते शहरी नागरिकांपर्यंत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. झाडे म्हणजे ऑक्सिजनचे सिलेंडर - मोफत पण अमूल्य! आज आपण जितकी झाडे लावू व ती टिकवून ठेऊ, तितका आपला भविष्याचा श्वास सुरक्षित होईल. झाडांच्या सावलीतली शांतता कुठल्याही वातानुकूलित यंत्रणेत नाही. शाश्वत शांतता, आरोग्य, स्वच्छता आणि जिवंत पृथ्वी यासाठी झाडे लावणे अत्यावश्यक आहे. आणि इतरांनाही प्रेरणा देणेही तितकंच महत्त्वाचं आहे. आपण नसेल तरी झाडे राहतील आणि कोणी तरी त्यांची सावली लाभेल. म्हणून आजच एक झाड लावा, ते जपा आणि निसर्गाशी आपले नाते पुनर्स्थापित करा. कारण झाडे जिवंत राहिली तरच निसर्ग राहील, निसर्ग राहिला तरच आपण राहू!

हॅलो प्रभात
MY CITY
५
■ शनिवार, ३१ मे २०२५

## 'या' करारामुळे कॅन्सर सेंटर अधिकच सक्षम : डॉ. सूरज पवार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**
कॅन्सर रुग्णांच्या जीवनात प्रकाशाचा किरण आणणाऱ्या कोल्हापूर कॅन्सर सेंटरचे नाव आता जागतिक स्तरावर पोहचले आहे. कोल्हापूर कॅन्सर सेंटर आता कॅन्सर सेंटर्स ऑफ अमेरिकेशी संलग्न झाले असून याबाबतचा सामंजस्य करार आज कोल्हापूर कॅन्सर सेंटरमध्ये झाला. सामंजस्य करारावर कोल्हापुर कॅन्सर सेंटरचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सूरज पवार व कॅन्सर सेंटर्स ऑफ अमेरिकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अँड चीफ डेव्हलपमेंट ऑफिसर राजेश मंथेना यांनी स्वाक्षरी करून कराराचे अदान – प्रदान केले. या कराराची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली होती.

यावेळी डॉ.सूरज पवार म्हणाले, कॅन्सर पेशंटना बरे करण्यासाठी अमेरिकेच्या हॉस्पिटल मधील तंत्रज्ञानाचा चांगला वापर करता येईल. या पत्रकार परिषदेला व्हिडिओ कॉलद्वारे अमेरिकेतून कॅन्सर सेंटर्स ऑफ अमेरिकाचे चेअरमन ऑफ बोर्ड डॉ. शालीन शहा, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. रेश्मा पवार, स्मिता राजू, डॉ. योगेश अनाप, डॉ. पराग वाटवे, दयाकर पी, साई संदीप कटेपल्ली यांच्यासह कोल्हापूर कॅन्सर सेंटरचे सर्व डॉक्टर, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# . संमिश्र .

## अदानी पोर्ट्सने जारी केले सर्वात मोठे देशांतर्गत बाँड



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**
अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड), भारतातील सर्वात मोठी एकात्मिक ट्रान्सपोर्ट युटिलिटी कंपनीने १५ वर्षांच्या नॉन–कन्व्हर्टिबल डिबेंचर्स द्वारे ५,००० कोटी रुपये यशस्वीरित्या उभारले आहेत. एपीएसईझेडच्या मजबूत आर्थिक स्थितीवर आणि 'एएए/स्टेबल' देशांतर्गत क्रेडिट रेटिंगवर आधारित या बाँडला ७.७५% वार्षिक व्याजदर मिळाला असून, ते पूर्णपणे एलआयसी कडून सबस्क्राइब करण्यात आले आहेत. हे डिबेंचर्स बीएसईवर सूचीबद्ध होतील. या बाँड इश्यूमुळे एपीएसईझेडला विविध स्रोतांमधून आकर्षक दराने दीर्घकालीन भांडवल मिळवण्याची क्षमता सिद्ध झाली असून, कंपनीच्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी लक्षणीयरित्या वाढवण्यात आला आहे.

## आर्थिक वर्ष २०२४– २५ मध्ये इफकोची दमदार कामगिरी




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**
जगातील अग्रणी सहकारी संस्था असलेल्या इफकोने आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये रु. ३,८११ कोटी इतक्या करपूर्व नफ्याची (पीबीटी) म्हणून नोंद केली असून, नॅनो खतांच्या विक्रीत ४७% वाढ झाली आहे. या आर्थिक वर्षात (२०२४–२५) इफकोने नॅनो खतांच्या एकूण ३६५.०९ लाख बाटल्यांची विक्री केली, तर मागील आर्थिक वर्षात (२०२३–२४) ही संख्या २४८.९५ लाख होती. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये इफकोची एकूण उलाढाल रु. ४१,२४४ कोटी इतका नोंदविण्यात आली.

## महापालिकेत निधीचे समान वाटप करा दुजाभाव नको : आ.जयंत पाटील



**सांगली : हॅलो प्रभात**
महापालिकेला विविध विकासकामांच्या निधीचे वाटप करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या माजी नगरसेवकांवर अन्याय केला जातो, अशी तक्रार पक्षाच्या नगरसेवकांनी केल्यानंतर आ. जयंत पाटील यांनी आयुक्तांची भेट घेतली. सत्ताधारी पक्षाच्या माजी नगरसेवकांबरोबर विरोधी पक्षातील माजी नगरसेवकांना देखील निधी द्यावा, अशा सूचना आ. पाटील यांनी केल्या.

महापालिकेच्या निधीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांच्याकडे तक्रार केली. तक्रार केल्यानंतर शुक्रवारी आ. पाटील यांनी आयुक्त सत्यम गांधी यांची भेट घेतली. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय बजाज, माजी महापौर मैनुद्दीन बागवान, स्थायी समितीचे माजी सभापती हरिदास पाटील, माजी नगरसेवक अभिजीत भोसले, शेडजी मोहिते, हरिदास पाटील, विजय घाडगे, अभिजीत हारगे, शिवाजी दुर्वे, अभिजीत कोळी, संगीता हारगे, नर्गिस सय्यद आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन समितीची वार्षिक योजना तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास योजनेतून महापालिका क्षेत्राच्या विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला. या निधीतून माजी नगरसेवकांनी कामे सूचवली होती. मात्र ही कामे केली गेली नसल्याची तक्रार करण्यात आली. आयुक्तांनी याची माहिती घेऊ, लोकप्रतिनिधींची कामे प्राधान्याने घेऊ, अशी ग्वाही दिली. तर महापालिका क्षेत्राचा समतोल विकास व्हावा. माजी नगरसेवकांनी मांडलेल्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. प्रलंबित प्रश्न, समस्या सोडवाव्यात, अशा सूचना आ. जयंत पाटील यांनी दिल्या.

## दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्त दूध दर देण्यासाठी कटिबद्ध : नविद मुश्रीफ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**
गोकुळ दूध संघाच्या चेअरमनपदी नविद हसन मुश्रीफ यांची एकमताने निवड झाली निवडणूक अधिकारी राजकुमार पाटील विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दूग्ध पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली निवड करणेत आली.



या निवडीनंतर बोलताना गोकुळचे नूतन चेअरमन नविद मुश्रीफ म्हणाले कि, गोकुळ दूध संघाच्या चेअरमन पदी माझी एकमताने निवड करून जो विश्वास माझ्यावर दाखवण्यात आला आहे. त्याबद्दल मी शाहू आघाडीचे सर्व नेते मंडळी, माझे सहकारी संचालक मंडळ तसेच माझ्या शेतकरी बांधवांचे मनपूर्वक आभार मानतो. मी भविष्यात काम करत असताना दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दूध दर देण्यासाठी कटिबद्ध असून दूध संकलन, प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था अधिक पारदर्शक व कार्यक्षम राबूवन नव्या तंत्रज्ञानाचा व्यवस्थापन प्रणालींचा समावेश करून गोकुळची गुणवत्ता आणि ब्रँड ची विश्वासार्हता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणार आहे. तसेच या दुग्ध व्यवसायामध्ये महिला व युवा शेतकरी अधिक सक्रीय होण्यासाठी त्यांना गोकुळ मार्फत प्रोत्साहन देण्याचा माझा प्रयत्न असेल.

## विकसित कृषी संकल्प अभियानास मोजे सोलंकरवाडी येथून प्रारंभ

**मोडनिंब : संतोष पांढरे**
शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे त्याचबरोबर ज्या नवीन तंत्रज्ञान कृषी विद्यापीठे रिसर्च स्टेशन येथे विकसित होते ते फक्त तेथेच मर्यादित न राहता शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे याकरिता विकसित कृषी संकल्पना अभियान २९ मे ते १२ जून २०२५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पोहोचवण्याचे काम कृषी विज्ञान केंद्र मोहोळ कृषी विभाग आणि राष्ट्रीय संशोधन केंद्र डाळिंब , केंद्रीय भरडधान्य संशोधन संस्था सोलापूर यांच्यामार्फत केले जाणार आहे.

पहिल्याच दिवशी माढा तालुक्यातील सोलंकर वाडी येथून कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे तसेच कृषी अधिकारी शरद गावडे, उप कृषी अधिकारी दादासाहेब पवार, सहाय्यक कृषी अधिकारी कु. स्मिता बादगुडे, कु.पल्लवी मामडगे, राजशेखर कांबळे, कु.अश्विनी जगताप उपस्थित होते. सदर कार्यक्रमादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना डॉ पंकज मडावी यांनी खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले त्याचबरोबर श्रीमती काजल म्हात्रे यांनी नैसर्गिक शेती त्याचबरोबर जमीन आरोग्य व्यवस्थापन,जमीन आरोग्य पत्रिका याबद्दल मार्गदर्शन केले. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे



विषय विशेषज्ञ यांनी कृषि मालाचे मूल्यवर्धन, डाळ मिल उद्योग, कडधान्य प्रक्रिया आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.

सोलापूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र येथील डॉक्टर शिल्पा परशुराम यांनी डाळिंब पिकातील तेल्या रोग व डाळिंबामध्ये येणारा मर रोग याबद्दल शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर उपस्थित शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी बियाणांना जैविक खताची बीजप्रक्रिया कशाप्रकारे करावी याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. त्याचबरोबर ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे कमी वेळेमध्ये फवारणी करण्यासाठी शेतकऱ्यांना ड्रोनचे प्रत्यक्ष देखील करून दाखवण्यात आले.

यावेळी सोलंकर वाडी गावातील राजाभाऊ भांगिरे,अनंता गलांडे,बाबासाहेब पांढरे,रमेश शेंडगे,भीमराव मोरे, वामन यादव, अतुल माळी, विठ्ठल झाडकर, मारुती कांबळे, तुकाराम भांगीरे, गणेश माळी, गोपाळ माळी यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

त्याचबरोबर माढा तालुक्यातील पडसाळी येथे देखील सदर अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांना तांत्रिक सत्र मध्ये खरीप पिकातील पीक व्यवस्थापन तसेच कीड व रोग व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. मोहोळ तालुक्यातील शेटफफळ गावामध्येही देखील रथाचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

शेटफफळ मध्ये डाळिंब बागायतदार शेतकरी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमास उपस्थित होते त्यावेळी श्री.भांगे यांच्या डाळिंब बागेमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना मार्गदर्शन डॉक्टर शिल्पा परशुराम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका कृषी अधिकारी मोहोळ अतुल पवार, कृषी अधिकारी गायत्री चव्हाण, उपकृषी अधिकारी यांचे सहकार्य लाभले.

# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि भविष्य



**दै. हॅलो प्रभात**
कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence-AI) ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सर्वात मोठी आणि प्रभावशाली क्रांती मानली जाते. गेल्या काही दशकांमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अख ने मानवी जीवनात आपले स्थान निर्माण केले आहे आणि भविष्यातही त्याचा प्रभाव अधिक व्यापक आणि खोलवर जाणार आहे. संगणक आणि यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे विचार करण्याची, शिकण्याची आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता देणारी ही एक तंत्रज्ञान शाखा आहे. यात मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया (Natural Language Processing), रोबोटिक्स आणि डेटा विश्लेषण यांसारख्या अनेक उपशाखांचा समावेश होतो. आज आपण वापरत असलेले स्मार्टफोनमधील व्हॉईस असिस्टंट (उदा., Siri, Alexa), स्वयंचलित वाहने किंवा ऑनलाइन शॉपिंगवरील शिफारशी ही अख चीच उदाहरणे आहेत.




> 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हे एक शक्तिशाली साधन आहे, ज्याचा योग्य वापर केल्यास मानवजातीच्या प्रगतीसाठी आणि जीवन सुलभ करण्यासाठी चमत्कार घडू शकतात. परंतु त्याचवेळी त्याच्या नकारात्मक परिणामांचा विचार करून त्याचा वापर संयमाने आणि नैतिकतेने करणे आवश्यक आहे. भविष्यात अख आणि मानव यांच्यातील सहकार्य वाढले तर आपण एक अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि समृद्ध जग निर्माण करू शकू.
> – प्रा.अमोल वंडे

AI ची सुरुवात ही मुळात मानवाच्या बुद्धिमत्तेची नक्कल करण्याच्या उद्देशाने झाली. १९५० च्या दशकात अॅलन ट्युरिंग यांनी 'ट्युरिंग टेस्ट' मांडली, ज्यामुळे AI च्या संकल्पनेला अधिक गती मिळाली. तेव्हापासून या क्षेत्रात सातत्याने संशोधन आणि विकास होत आहे. आज अख केवळ संशोधनापुरते मर्यादित न राहता, प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. त्याचे वर्तमानातील योगदान हे अनेक क्षेत्रांमध्ये स्पष्टपणे दिसून येते आणि त्याचा प्रभाव भविष्यात आणखी वाढणार आहे. या लेखात आपण अख ची सध्याची स्थिती, त्याचे वर्तमानातील योगदान, भविष्यातील शक्यता आणि त्यासोबत येणारी आव्हाने याबद्दल सविस्तर चर्चा करणार आहोत.

AI चे वर्तमानातील योगदान हे सर्वप्रथम आरोग्यसेवा क्षेत्रात दिसून येते. अख च्या मदतीने रोगांचे निदान जलद आणि अचूक होत आहे. उदाहरणार्थ, कर्करोग, हृदयविकार किंवा मधुमेह यांसारख्या गंभीर आजारांचे प्रारंभिक निदान करण्यासाठी अख–आधारित सॉफ्टवेअर वापरले जाते. मोठ्या प्रमाणात वैद्यकीय डेटाचे विश्लेषण करून रुग्णांसाठी योग्य उपचार पद्धती सुचवण्यातही अख चा हातभार लागतो. याशिवाय, शस्त्रक्रियेदरम्यान रोबोटिक सिस्टीम्सचा वापर आणि औषध संशोधनात AI चा उपयोग यामुळे आरोग्यसेवा क्षेत्रात क्रांती घडली आहे. रुग्णांचे आयुष्यमान वाढवणे आणि उपचारांचा खर्च कमी करणे हेही अख मुळे शक्य होत आहे.

शिक्षण क्षेत्रातही AI चा प्रभाव वाढत आहे. ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांच्या क्षमता आणि आवडीनुसार अभ्यासक्रम तयार करणे, त्यांच्या शंकांचे त्वरित निरसन करणे आणि वैयक्तिक शिक्षणाचा अनुभव देणे हे अख मुळे शक्य झाले आहे. उदाहरणार्थ, AI-आधारित चॅटबॉट्स विद्यार्थ्यांना २४/७ मदत करू शकतात, तर मशीन लर्निंगच्या मदतीने त्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करून अभ्यासाच्या पद्धती सुधारता येतात. यामुळे शिक्षण अधिक समावेशक आणि प्रभावी बनत आहे, विशेषतः ज्या ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे तिथे अख एक पर्याय ठरत आहे.

उद्योग आणि व्यवसायातही AI चा मोठा वाटा आहे. कारखान्यांमध्ये स्वयंचलित यंत्रांचा वापर, उत्पादन प्रक्रिया सुलभ करणे आणि गुणवत्ता तपासणी यासाठी AI चा उपयोग होतो. ग्राहक सेवेसाठी चॅटबॉट्स आणि व्हॉईस असिस्टंट यांचा वापर वाढत आहे, ज्यामुळे ग्राहकांचा अनुभव सुधारतो आणि व्यवसायांचा खर्च कमी होतो. डेटा विश्लेषणाच्या मदतीने बाजारातील ट्रेंड समजून घेणे, ग्राहकांच्या गरजा ओळखणे आणि त्यानुसार धोरणे आखणे हेही AI मुळे सोपे झाले आहे. यामुळे छोट्या व्यवसायांपासून ते मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांपर्यंत सर्वांना फायदा होत आहे.

दैनंदिन जीवनात AI चा प्रभाव सर्वत्र जाणवतो. स्मार्टफोनमधील फेस रेकग्निशन, व्हॉईस कमांड्स, ट्रॅफिक नेव्हिगेशन किंवा ऑनलाइन खरेदीवेळी मिळणाऱ्या शिफारशी या सर्व गोष्टी अख मुळे सुलभ झाल्या आहेत. घरी वापरले जाणारे स्मार्ट उपकरणे, जसे की स्मार्ट स्पीकर्स, थर्मोस्टॅट्स आणि सिक्युरिटी कॅमेरे, हे AI च्या तंत्रज्ञानावरच चालतात. यामुळे आपले जीवन अधिक स्मार्ट, सोयीस्कर आणि सुरक्षित बनले आहे. AI चा हा प्रभाव भविष्यात आणखी वाढणार आहे, ज्यामुळे आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडतील.

भविष्यात AI चा प्रभाव अधिक गहन आणि व्यापक होईल. स्वयंचलित वाहतूक हे त्याचे एक ठळक उदाहरण असेल. स्वयंचलित कार, ट्रक, बस आणि ड्रोन यांच्या विकासामुळे वाहतूक सुरक्षित, जलद आणि कार्यक्षम होईल. मानवी चुकांमुळे होणारे अपघात कमी होतील आणि वेळेसह इंधनाचीही बचत होईल. याशिवाय, लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन मॅनेजमेंटमध्येही अख चा मोठा उपयोग होईल, ज्यामुळे वस्तूंची वाहतूक जलद आणि स्वस्त होईल. ही स्वप्ने आता वास्तवात उतरत आहेत, कारण अनेक कंपन्या स्वयंचलित वाहनांच्या चाचण्या यशस्वीपणे करत आहेत.

नोकऱ्यांच्या क्षेत्रातही AI मुळे मोठे बदल अपेक्षित आहेत. काही पारंपरिक नोकऱ्या, विशेषतः अकुशल किंवा पुनरावृत्तीची कामे करणाऱ्या नोकऱ्या कमी होऊ शकतात. उदाहरणार्थ, कारखान्यातील मजूर किंवा डेटा एंट्रीची कामे अख आणि रोबोट्स सहज करू शकतात. परंतु त्याचवेळी अख डेव्हलपमेंट, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी आणि रोबोटिक्स यांसारख्या नवीन क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण होतील. यासाठी नवीन कौशल्ये शिकणे आणि स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे ठरेल. भविष्यातील नोकऱ्या या तंत्रज्ञानावर आधारित असतील, ज्यामुळे शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या पद्धतीतही बदल घडेल.

पर्यावरण संरक्षणासाठीही AI चा मोठा उपयोग होऊ शकतो. हवामान बदल, प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास यावर उपाय शोधण्यासाठी AI च्या मदतीने ऊर्जे चा कार्यक्षम वापर, नवीन हरित तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रदूषण नियंत्रण शक्य होईल. उदाहरणार्थ, AI च्या मदतीने स्मार्ट ग्रिड सिस्टीम्स तयार करता येतील, ज्यामुळे वीजेचा अपव्यय कमी होईल. याशिवाय, जंगलतोड आणि पर्यावरणातील बदलांचे निरीक्षण करण्यासाठी सॅटेलाइट डेटाचे विश्लेषणही अख करू शकते. या सर्व गोष्टी पृथ्वीला अधिक टिकाऊ आणि राहण्यायोग्य बनवण्यात मदत करतील.

मात्र, AI च्या या प्रगतीबरोबरच काही आव्हाने आणि धोकेही समोर येत आहेत. सर्वप्रथम, AI ला कार्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात डेटाची आवश्यकता असते. यामुळे वैयक्तिक माहितीच्या गोपनीयतेचा आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. जर हा डेटा चुकीच्या हातात गेला तर त्याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होऊ शकतो. दुसरे म्हणजे, स्वयंचलनामुळे अकुशल कामगारांच्या नोकऱ्या धोक्यात येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे बेरोजगारी आणि सामाजिक असमानता वाढू शकते.

तिसरे, अख चा वापर जर शस्त्रास्त्रे, हेरगिरी किंवा दहशतवादी कारवायांसाठी झाला तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर होतील. याशिवाय, AI जर अति बुद्धिमान झाले आणि मानवाच्या नियंत्रणाबाहेर गेले तर त्याचा धोका किती मोठा असेल, याची कल्पनाही करवत नाही.

शेवटी, कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक शक्तिशाली साधन आहे, ज्याचा योग्य वापर केल्यास मानवजातीच्या प्रगतीसाठी आणि जीवन सुलभ करण्यासाठी चमत्कार घडू शकतात. परंतु त्याचवेळी त्याच्या नकारात्मक परिणामांचा विचार करून त्याचा वापर संयमाने आणि नैतिकतेने करणे आवश्यक आहे.


या तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना त्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंचा समतोल साधणे हे आपल्या हातात आहे. आपण या बदलांसाठी तयार आहोत का आणि याचा उपयोग आपण कसा करणार आहोत, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा! अख चे भविष्य हे मानवाच्या हातात आहे आणि ते कसे घडेल हे आपल्या आजच्या कृतींवर अवलंबून आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि भविष्य – हायलाईट्स

* **कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याख्या :** AI म्हणजे संगणक आणि यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे विचार, शिकणे आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान.
* **वर्तमानातील योगदान:** शीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया आणि रोबोटिक्स यांचा समावेश.
* **आरोग्यसेवा :** रोगांचे जलद निदान (उदा., कर्करोग), वैद्यकीय डेटा विश्लेषण, शस्त्रक्रिया रोबोट्स.
* **शिक्षण:** वैयक्तिक शिक्षण, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर चॅटबॉट्सद्वारे शंकानिरसन.
* **उद्योग:** स्वयंचलित यंत्रे, ग्राहक सेवा चॅटबॉट्स, डेटा विश्लेषणाद्वारे बाजार ट्रेंड समजणे.
* **दैनंदिन जीवन:** फेस रेकग्निशन, व्हॉईस असिस्टंट, ऑनलाइन शिफारशी.
* **भविष्यातील शक्यता :** स्वयंचलित वाहतूक: स्वयंचलित कार, ड्रोनमुळे सुरक्षित आणि कार्यक्षम वाहतूक.
* **नोकऱ्या :** पारंपरिक नोकऱ्या कमी, नवीन क्षेत्रांत संधी (AI डेव्हलपमेंट, डेटा सायन्स).
* **वैयक्तिक सहाय्यक :** प्रत्येक व्यक्तीसाठी अख सहाय्यक, दैनंदिन कामांचे नियोजन.
* **पर्यावरण :** ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण, हवामान बदलावर उपाय.
* **आव्हाने आणि धोके :** गोपनीयता – डेटा सुरक्षेचा धोका.
* **नोकऱ्यांचे संकट :** स्वयंचलनामुळे अकुशल कामगारांच्या नोकऱ्या धोक्यात.
* **नैतिक प्रश्न :** AI चा गैरवापर (शस्त्रास्त्रे, हेरगिरी).
* **नियंत्रण:** AI मानवाच्या नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती.
* **निष्कर्ष :** AI हे शक्तिशाली साधन, जबाबदारीने वापर आवश्यक. मानव–AI सहकार्याने स्मार्ट आणि समृद्ध भविष्य शक्य. सकारात्मक–नकारात्मक पैलूंचा समतोल साधणे गरजेचे.



**प्रा.अमोल वंडे**
**भारती विद्यापीठ,सांगली**
(लेखक कॉम्प्युटर सायन्स, बिझनेस मॅनेजमेंट विषयाचे प्राध्यापक व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संशोधक आहेत)


शनिवार
31 मे
वाढदिवस
माणसं जोडणाऱ्या..
नाती जपणाऱ्या..
मदतीसाठी तत्पर..
सदैव सकारात्मक..
व्हिजनरी..
युवा नेतृत्वाचा
माननीय
ऋतुराज संजय पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
मा. ऋतुराज पाटील खालील ठिकाणी शुभेच्छा स्वीकारतील
सकाळी 9 ते 12 यशवंत निवास, कसबा बावडा
सायंकाळी 5 ते 9 डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, साळोखेनगर